खालील (क्यू आर कोड) स्कॅन करा...
आणि अक्षराज मीडियाच्या व्हाट्सअप चॅनल ला
फॉलो करा व मिळवा सर्व घडामोडींचे अपडेट्स
एकाच वेळी एकाच ठिकाणी...
कृपया इथे स्कॅन करा
Plz Scan Here

दैनिक **अक्षराज**
अचूक वेध, अचूक बातमी
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध
Email : newsaksharaj2021@gmail.com




वर्ष : ०६ | अंक : ३४, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, गुरुवार, दि.१७ सप्टेंबर २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056

# चिन्हाचा विषय तेव्हा राजकीय पक्षच महत्त्वाचा, सुप्रीम कोर्टाची मोठी टिपण्णी

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१६, मुंबई :** सुप्रीम कोर्टात शिवसेना पक्ष आणि चिन्हाबाबतचं प्रकरण आता अत्यंत उत्कंठावर्धक वळणावर आलं आहे. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांचे वकील कपिल सिब्बल यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या मुख्यनेतापदाच्या निवडीवर आक्षेप घेतला होता. त्यांनी हे पद कायदेशीर नसल्याचा युक्तिवाद केला होता. त्यांचा हाच युक्तिवाद एकनाथ शिंदे यांचे वकील नीरज किशन कौल यांनी खोडून काढण्याचा प्रयत्न केला. एकनाथ शिंदे यांची मुख्यनेतापदी झालेली निवड कशी योग्य आहे? याबाबत कौल यांनी युक्तिवाद केला.

विशेष म्हणजे निवडणूक आयोगाने पक्ष आणि चिन्ह देताना कोणत्या गोष्टींचा विचार केला आणि त्या देत असताना कुठली पद्धत योग्य ठरली, याबाबत कौल यांनी विश्लेषण केलं. एकीकडे कौल यांच्याकडून वारंवार विधीमंडळ पक्षाच्या संख्येबाबतच्या युक्तिवादावर जोर धरला जात असताना सुप्रीम कोर्टाने राजकीय पक्ष पाहून चिन्ह दिलं जातं, अशी महत्त्वाची टिप्पणी केली. यामुळे



हे प्रकरण प्रचंड उत्कंठावर्धक वळणावर आल्याचं बघायला मिळत आहे. नीरज किशन कौल यांना आज युक्तिवाद करण्यासाठी केवळ अर्धा तासांचा वेळ मिळाला. आपण उद्या पुन्हा युक्तिवाद करु, असं नीरज किशन कौल यांनी कोर्टात सांगितलं.

**नीरज किशन कौल यांचा युक्तिवाद काय?**

सध्याचा वाद हा एकनाथ शिंदे यांच्या नियुक्तीचा नाही. कोणता मूळ पक्ष हा सध्या मुद्दा आहे. शिंदे यांनी आमदार आणि मंत्री म्हणून जे काम केलं ते लोकप्रतिनिधी म्हणून केलं. त्यावर आक्षेप घेण्याचा प्रश्नच नाही, असा युक्तिवाद नीरज किशन कौल यांनी केला. पक्षातील अंतर्गत लोकशाहीचा प्रश्न महत्त्वाचा आहे, असा युक्तिवाद नीरज किशन कौल यांनी केला.

पक्षाला चांगल्या उत्तरदायित्वाची अपेक्षा आहे. उद्धव ठाकरेंच्या वेळी ही अपेक्षा पूर्ण झाली नसल्याचं दिसून येतं. ठाकरेंनी पक्षाला स्वत:च्या वैयक्तिक व्यवस्थेप्रमाणे वापरण्याचा प्रयत्न केला, असा युक्तिवाद कौल यांनी केला. तसेच कार्यकर्त्याला पक्षात काय सुरु आहे यावर बोलण्याचा अधिकार आहे. तसेच पक्ष संघटना कशी चालावी यावर बोलण्याचा अधिकार आहे, असा युक्तिवाद नीरज किशन कौल यांनी केला.

**निवडणूक आयोगाने कोणत्या आधारावर शिंदेंना पक्ष दिला?**

केंद्रीय निवडणूक आयोगाने कोणत्या आधारावर एकनाथ शिंदेंना पक्षाचं नाव आणि चिन्ह बहाल केलं, याबाबत नीरज किशन यांनी युक्तिवाद केला. पक्ष कुणाचा हे ठरवण्यासाठी तीन टेस्ट घेण्यात आल्या. यामध्ये पहिली टेस्ट पक्षाची घटना होती. दुसरी संघटना होती आणि तिसरी विधीमंडळ पक्ष होती. तिसरी टेस्ट महत्त्वाची आहे, कारण पूर्वीच्या दोन टेस्टमध्ये समस्या आहेत, असा युक्तिवाद कौल यांनी केला.

यावेळी कौल यांनी २०१८ ची पक्षाची घटना ही निवडणूक आयोगाला देण्यात आली नव्हती, असा युक्तिवाद केला. तसेच पक्षाच्या संघटनेबाबत बोलायचं झालं तर पक्ष हा एकाधिकारशाहीत होता. त्यामुळे विधीमंडळ पक्षाची संख्या पाहून निर्णय घेण्यात आला, असा युक्तिवाद कौल यांनी केला.

**कोर्टाची महत्त्वाची टिपण्णी !**

विधीमंडळ पक्ष ही महत्त्वाची चाचणी आहे, असं नीरज कौल म्हणाले. संघटनेत दोन तृतीयांश पेक्षा जास्त लोक नियुक्त होत असतील तर पक्षात लोकशाही कुठे आहे? ही तर एकाधिकारशाही झाली ना?, असे सवाल कौल यांनी युक्तिवादात केले. यावर आपण इथे न्यायिक आढावा घेण्यासाठी बसलोय, अशी महत्त्वाची टिपण्णी कोर्टाने यावेळी केली.

**कौल यांच्याकडून सादिक अली केसचा दाखला**

निवडणूक आयोग ही एक महत्त्वाची संस्था आहे. निवडणूक आयोगाने पक्ष, चिन्ह देताना पडताळलेल्या बाबी योग्य आहेत. चिन्हाचा निर्णय देताना विधीमंडळ पक्षाची संख्या महत्त्वाची आहे. सादिक अली केसमध्येही याचा स्पष्ट उल्लेख आहे, असा युक्तिवाद नीरज किशन कौल यांनी केला.

**कोर्टाची मोठी टिप्पणी आणि कौल यांचं स्पष्टीकरण...**

जेव्हा विषय चिन्हाचा आहे तेव्हा राजकीय पक्ष महत्त्वाचा आहे, असं सुप्रीम कोर्ट म्हणालं. त्यावर नीरज कौल यांनी अगदी, मी सहमत आहे. पण विधीमंडळ पक्षाची चाचणी हीच आणि एकमवे महत्त्वाची चाचणी आहे, असं मी म्हटलेलं नाही, असं नीरज किशन कौल म्हणाले.

**एकनाथ शिंदेंच्या मुख्यनेता निवडीवर युक्तिवाद**

निवडणूक आयोग कोणत्याही पक्षाची मान्यता रद्द करु शकत नाही. मात्र पक्षांचा वाद आयोगाकडे गेल्यास ते निर्णय घेऊ शकतात, असा युक्तिवाद कौल यांनी केला. एकनाथ शिंदेंची मुख्यनेता म्हणून झालेली निवड चुकीची नव्हती. प्रतिनिधी सभेने ठराव करुन शिंदेंना मुख्यनेते म्हणून नेमले आणि पक्षातील संविधान दुरुस्त करण्यात यावे, अशी मागणी केली. त्याचे सर्व मिनिट्स उपलब्ध आहेत, असा युक्तिवाद कौल यांनी केला.

निवडणूक आयोगाने विधीमंडळ पक्ष चाचणी ही सर्वात मोठी चाचणी म्हटलेलं नाही. शक्य त्या सर्व चाचण्या घ्या असं आयोगाने म्हटलं आहे, असा युक्तिवाद कौल यांनी केला. २०१८ च्या घनेनुसार पक्षाच्या घटनेनुसार नेतृत्व एककेंद्र झालं होतं. पक्षात लोकशाहीपेक्षा सत्ताकेंद्र तयार करण्यात आले होते, असा आरोप कौल यांनी युक्तिवादात केला. यानंतर आजची सुनावणी संपली. आपण उद्या पुन्हा युक्तिवाद करु, असं कौल कौर्टात म्हणाले.

# ‘राजभाषा कीर्ती पुरस्कार’ मध्ये संरक्षण मंत्रालय देशात प्रथम

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.१५, ठाणे :** राजभाषा हिंदीच्या प्रभावी आणि उत्कृष्ट अंमलबजावणीसाठी भारत सरकारच्या गृह मंत्रालयांतर्गत राजभाषा विभागाकडून देण्यात येणाऱ्या ‘राजभाषा कीर्ती पुरस्कार २०२५-२६’ मध्ये संरक्षण मंत्रालयाने देशात प्रथम क्रमांक पटकावला आहे. ३०० हून अधिक कर्मचारी संख्या असलेल्या मंत्रालये व विभागांच्या श्रेणीत संरक्षण मंत्रालयाला हा मान मिळाला.

नवी मुंबईतील सिडको एक्झिबिशन सेंटर येथे १४ सप्टेंबर रोजी आयोजित हिंदी दिन सोहळा आणि सहाव्या अखिल भारतीय राजभाषा संमेलनात हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. केंद्रीय गृह व सहकार मंत्री अमित शाह यांच्या हस्ते संरक्षण मंत्रालयाचे अतिरिक्त सचिव मनीष त्रिपाठी यांनी पुरस्कार स्वीकारला.

या सोहळ्यास महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे तसेच उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजितदादा पवार यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित होते.

गृह मंत्रालयाच्या राजभाषा विभागातर्फे आयोजित या दोन दिवसीय संमेलनात देशभरातील विविध केंद्रीय मंत्रालये, शासकीय विभाग, सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम, बँका तसेच नगर राजभाषा अंमलबजावणी समितीचे (नराकास) अधिकारी सहभागी झाले. या संमेलनात सुमारे




७ हजारांहून अधिक हिंदीप्रेमी आणि प्रतिनिधींनी सहभाग नोंदविला.

संरक्षण मंत्रालयाला मिळालेला हा पुरस्कार म्हणजे अधिकृत कामकाजात राजभाषेचा प्रभावी वापर, सातत्यपूर्ण बांधिलकी आणि अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या सामूहिक प्रयत्नांची दखल असल्याचे मानले जात आहे. या गौरवामुळे अधिकृत कामकाजात हिंदीचा अधिकाधिक आणि गुणात्मक वापर वाढविण्याच्या प्रयत्नांना नवी ऊर्जा मिळाली आहे.

# नवी मुंबईत दीड दिवसांत १०,१६९ गणेशमूर्तींचे भक्तीपूर्ण विसर्जन

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.१६, नवी मुंबई :** महानगरपालिका क्षेत्रात श्रीगणेश चतुर्थीपासून सुरू झालेल्या गणेशोत्सवात दीड दिवसांच्या कालावधीत १८९ विसर्जन स्थळांवर १०,१६९ श्रीगणेशमूर्तींचे नियोजनबद्ध आणि भक्तीपूर्ण विसर्जन करण्यात आले. महापौर सुजाता पाटील आणि आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांनी केलेल्या पर्यावरणपूरक व प्लास्टिकमुक्त गणेशोत्सवाच्या आवाहनाला नागरिकांनी चांगला प्रतिसाद दिला.




नवी मुंबईतील २२ नैसर्गिक, ११ (१४ गावे) नैसर्गिक तसेच १५६ कृत्रिम विसर्जन स्थळांवर महापालिकेने आवश्यक सुविधा उपलब्ध करून दिल्या होत्या. २२ नैसर्गिक विसर्जन स्थळांवर ४,४१९ घरगुती आणि ८ सार्वजनिक मंडळांच्या ४,४२७ मूर्तींचे विसर्जन झाले. १५६ कृत्रिम विसर्जन स्थळांवर ५,६१० घरगुती आणि १६ सार्वजनिक मूर्तींचे, तर १४ गावांतील विसर्जन स्थळांवर ११६ घरगुती मूर्तींचे विसर्जन करण्यात आले. एकूण १०,१४५ घरगुती आणि २४ सार्वजनिक मंडळांच्या मूर्तींचे विसर्जन झाले.

उच्च न्यायालयाच्या निर्देशांनुसार सहा फुटांपेक्षा कमी उंचीच्या मूर्तींचे कृत्रिम तलावात विसर्जन करण्यावर भर देण्यात आला. नागरिकांच्या सोयीसाठी मोठ्या संख्येने कृत्रिम तलाव उभारण्यात आले होते. नैसर्गिक विसर्जन स्थळांवर तराफे, ध्वनीक्षेपक, विद्युत व जनरेटर व्यवस्था, वैद्यकीय पथके, स्वयंसेवक आणि लाईफगार्ड्स तैनात करण्यात आले होते. या व्यवस्थेबद्दल नागरिकांनी समाधान व्यक्त केले.

पर्यावरणपूरक गणेशोत्सवाला प्रोत्साहन देताना २,४१४ शाडू मातीच्या गणेशमूर्तींचे विसर्जन झाले. शाडूच्या मूर्तींची प्रतिष्ठापना करणाऱ्या नागरिकांचा विसर्जनस्थळी कापडी पिशवी व प्रशस्तिपत्र देऊन गौरव करण्यात आला. विसर्जन स्थळांवर ओले व सुके निर्माल्य स्वतंत्रपणे संकलित करण्यात आले. स्वतंत्र वाहनांद्वारे निर्माल्य तुर्भे येथील प्रकल्पस्थळी नेऊन त्याची योग्य विल्हेवाट लावण्याची व्यवस्था करण्यात आली.

दीड दिवसांच्या विसर्जनाला नागरिकांनी महापालिका व पोलीस यंत्रणेला सहकार्य केल्याबद्दल महापौर सुजाता पाटील आणि आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी नागरिकांचे आभार मानले. पुढील विसर्जनाच्या दिवशीही नागरिकांनी प्रशासनाला सहकार्य करून विसर्जन सोहळा शांततेत व सुव्यवस्थित पार पाडावा, असे आवाहन करण्यात आले.

# सिंदेवाहीत भरदिवसा घरफोडी !

## आंतरजिल्हा टोळीतील दोघे वर्ध्यातून जेरबंद

**अक्षराज : वसंत वडस्कर**



**दि.१६, चंद्रपूर :** सिंदेवाही पोलीस ठाणे हद्दीत घरफोडी करून सोन्या-चांदीचे दागिने व रोख रक्कम, सा जवळपास ₹ २ लाख ९३ हजारांचा मुद्देमाल चोरीला गेल्याच्या प्रकरणाचा स्थानिक गुन्हे शाखेने छडा लावला आहे. सीसीटीव्ही फुटेज आणि तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे पोलिसांनी वर्धा जिल्ह्यातील सावंगी मेघे येथून दोन संशयित आरोपींना ताब्यात घेत गुन्हा उघडकीस आणला.

दिनांक ९ सप्टेंबर २०२६ रोजी फिर्यादी आपल्या परिवारासह बाहेरगावी गेले असता त्यांच्या घरातील सोन्या-चांदीचे दागिने तसेच रोख रक्कम चोरीस गेली. याबबत सिंदेवाही पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली. त्यावरून अप.क्र.५४७/ २०२६,कलम ३३१(४),३०५ भारतीय न्याय संहिता अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. या गुन्ह्याचा तपास करताना स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने घटनास्थळावरील सीसीटीव्ही फुटेज तसेच तांत्रिक विश्लेषणाचा आधार घेत आरोपींची माहिती मिळवली. त्यानंतर पथकाने सावंगी मेघे येथून सुनील शांताराम शिंदे (वय २४), रा.बोरगाव टेकडी, सावंगी मेघे, जि.वर्धा आणि सुजल युवराज कुमरे (वय १९), रा.बोरगाव टेकडी, सावंगी मेघे, जि.वर्धा यांना ताब्यात घेतले.

आरोपींकडून पोलिसांनी सोन्याचे मंगळसूत्र, सोन्याचे मणी, चांदीचे कडे, चांदीच्या पायपट्ट्या व गोप इतर दागिने, रोख रक्कम असा अंदाजे ₹२ लाख ९३ हजार ३२७ रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास सिंदेवाही पोलीस ठाणे येथे सुरू आहे.

कारवाई पथक : - जिल्हा पोलीस अधीक्षक आयुष नोपानी व अपर पोलीस अधीक्षक ईश्वर कातकडे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अमोल काचोरे यांच्या नेतृत्वात उपविभाग वरोरा तसेच ब्रह्मपुरी पथक आणि स्थानिक गुन्हे शाखा, चंद्रपूरच्या पथकाने ही कारवाई केली.

# बाप्पाच्या आगमनावेळी कृष्णाचा अपघाती मृत्यू

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१६, नाशिक :** ज्या घरादारांत आणि गल्लीबोळांत बाप्पाच्या आगमनाची उत्सुकता शिगेला पोहोचली होती, जिथे ढोल-ताशांच्या गजरात आणि ‘मोरया’च्या जयघोषात लाडक्या गणरायाचे स्वागत करण्याची तयारी पूर्ण झाली होती, तिथेच एका क्षणात शांतता पसरली. गणेशमूर्ती आणण्यासाठी रात्रीच्या अंधारात निघालेला २३ वर्षीय कृष्णा ज्ञानेश्वर बेरड याचा अपघाती मृत्यू झाल्याने वडनेर दुमाला परिसरावर शोककळा पसरली आहे. उत्सवाच्या आनंदात रंगलेले वातावरण क्षणात दुःखात बदलले आहे.

नेमकी घटना काय?

वडनेर येथील ‘मोरया फाउंडेशन’च्या माध्यमातून गावातील तरुण यंदा प्रथमच मोठ्या प्रमाणावर सार्वजनिक गणेशोत्सव साजरा करण्याच्या तयारीत होते. बाप्पाचे आगमन दिमाखात व्हावे, यासाठी कृष्णा आणि त्याचे मित्र गेल्या काही दिवसांपासून अथक मेहनत घेत होते. सोमवारी (दि. १४) रात्री उशिरा पाथर्डी फाट्यावरील काम आटोपून कृष्णा मित्रासह आडगाव नाक्याकडे गणेशमूर्ती आणण्यासाठी निघाला होता. मात्र, छत्रपती संभाजी नाका परिसरातील उड्डाणपुलाजवळ त्याच्या दुचाकीचा अपघात झाला.




## मराठवाडा मुक्ती संग्राम

आज १७ सप्टेंबर. हा दिवस मराठवाडा मुक्ती संग्राम दिन म्हणून साजरा केला जातो. १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारताला स्वातंत्र्य मिळाले; मात्र देश स्वतंत्र झाल्यानंतरही मराठवाडा निजामाच्या राजवटीखाली पारतंत्र्यातच होता. त्यामुळे मराठवाड्यातील जनतेला स्वातंत्र्याचा अनुभव घेण्यासाठी आणखी एक संघर्ष करावा लागला. हा संघर्ष केवळ राजकीय नव्हता, तर तो स्वाभिमान, लोकशाही आणि भारतीय एकात्मतेसाठीचा लढा होता. पूर्वी मराठवाडा हैदराबाद संस्थानाचा भाग होता. या संस्थानावर निजाम मीर उस्मान अली खान याचे राज्य होते. भारत स्वतंत्र झाल्यानंतर संस्थानांनी भारतात सामील व्हावे, अशी भूमिका भारत सरकारने घेतली होती. मात्र निजामाने हैदराबाद संस्थान भारतात विलीन करण्यास नकार दिला. स्वतंत्र हैदराबादचे स्वप्न पाहणाऱ्या निजामाच्या भूमिकेमुळे संस्थानातील जनतेसमोर मोठे संकट निर्माण झाले. हैदराबाद संस्थानातील जनता मात्र भारताशी एकरूप होण्याच्या बाजूने होती. निजामाच्या राजवटीतून मुक्त होऊन भारतीय संघराज्यात सामील होण्यासाठी स्वामी रामानंद तीर्थ यांच्या नेतृत्वाखाली हैदराबाद मुक्ती संग्रामाला वेग आला. मराठवाड्यातही या आंदोलनाची तीव्रता वाढत गेली. गोविंदभाई श्रॉफ, रविनारायण रेड्डी, बाबासाहेब परांजपे यांच्यासह अनेक स्वातंत्र्यसैनिकांनी या लढ्यात महत्त्वपूर्ण योगदान दिले. हैदराबाद संस्थानात त्यावेळी तेलंगणा, मराठवाडा आणि कर्नाटकातील काही प्रदेशांचा समावेश होता. निजामाच्या राजवटीविरुद्ध आवाज उठविणाऱ्या जनतेवर मोठ्या प्रमाणात दडपशाही करण्यात आली. निजामाचा समर्थक कासीम रिझवी आणि रझाकारांच्या कारवायांमुळे जनतेमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. तरीही स्वातंत्र्याची आस असलेली जनता मागे हटली नाही. मराठवाड्यातील गावागावांतून स्वातंत्र्यसैनिक पुढे आले. अनेकांनी तुरुंगवास सहन केला, अनेकांनी लाठीमार आणि अत्याचार सोसले, तर अनेकांनी आपल्या प्राणांची पर्वा न करता भारतीय तिरंग्यासाठी संघर्ष केला. नांदेड, लातूर, परभणी, औरंगाबाद, उस्मानाबाद, बीड, जालना आणि हिंगोली या भागांतील जनतेनेही या आंदोलनात महत्त्वाची भूमिका बजावली. या लढ्यामुळे स्वातंत्र्याची भावना जनमानसात अधिक दृढ झाली. निजामाच्या राजवटीकडून जनतेवरील अन्याय आणि अत्याचार सुरूच राहिल्याने भारत सरकारने अखेर कठोर निर्णय घेतला. १३ सप्टेंबर १९४८ रोजी 'ऑपरेशन पोलो'अंतर्गत हैदराबाद संस्थानाविरुद्ध भारतीय सैन्याची कारवाई सुरू झाली. त्यावेळी सरदार वल्लभभाई पटेल भारताचे गृहमंत्री होते. संस्थानांचे भारतात विलीनीकरण करून देशाची अखंडता मजबूत करण्यामध्ये त्यांची भूमिका अत्यंत महत्त्वाची होती. भारतीय सैन्याने विविध दिशांनी हैदराबाद संस्थानात प्रवेश केला. सोलापूरच्या दिशेनेही भारतीय सैन्याने आगेकूच केली. काही दिवसांत भारतीय सैन्याने अनेक महत्त्वाची ठिकाणे ताब्यात घेतली. निजामाच्या सैन्याला भारतीय सैन्यापुढे फार काळ टिकाव धरता आला नाही. परिस्थिती हाताबाहेर जात असल्याचे लक्षात आल्यानंतर निजामाच्या सैन्याने शरणागती पत्करण्याचा निर्णय घेतला. अखेर १७ सप्टेंबर १९४८ रोजी हैदराबाद संस्थान निजामाच्या राजवटीतून मुक्त झाले. निजामाच्या सैन्याचे प्रमुख जनरल एल-एड्रूस यांनी भारतीय सैन्यासमोर शरणागती पत्करली. त्यानंतर हैदराबाद संस्थान भारताचा अविभाज्य भाग बनले आणि या प्रदेशात तिरंगा अभिमानाने फडकला. मराठवाड्यातील जनतेच्या दीर्घ संघर्षाला अखेर यश मिळाले. मराठवाडा मुक्ती संग्राम हा भारतीय स्वातंत्र्याच्या इतिहासातील एक महत्त्वाचा अध्याय आहे. देशाला १९४७ मध्ये स्वातंत्र्य मिळाले असले, तरी मराठवाड्यातील जनतेला निजामच्या अन्यायी राजवटीतून मुक्त होण्यासाठी १९४८ पर्यंत संघर्ष करावा लागला. त्यामुळे १७ सप्टेंबर हा दिवस मराठवाड्याच्या स्वाभिमानाचा, त्यागाचा आणि संघर्षाचा दिवस आहे. आजच्या पिढीने या इतिहासाकडे केवळ सुट्टीचा किंवा औपचारिक कार्यक्रमाचा दिवस म्हणून पाहू नये. स्वातंत्र्य आपल्याला सहज मिळालेले नाही. असंख्य ज्ञात-अज्ञात स्वातंत्र्यसैनिकांनी त्यासाठी त्याग केला आहे. त्यांच्या संघर्षामुळे आज आपण लोकशाही, स्वातंत्र्य आणि संविधानिक अधिकारांचा उपभोग घेत आहोत. त्यामुळे या इतिहासाची माहिती विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविणे आणि पुढील पिढीला स्वातंत्र्याच्या मूल्यांची जाणीव करून देणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे. मराठवाडा मुक्ती संग्रामाने आपल्याला एक महत्त्वाचा संदेश दिलाअन्याय कितीही मोठा असला तरी संघटित जनशक्ती, धैर्य आणि स्वातंत्र्याची प्रबळ इच्छा यांच्यापुढे तो टिकू शकत नाही. या संग्रामातून राष्ट्रीय एकात्मता, लोकशाही आणि स्वाभिमानाचे महत्त्व अधोरेखित होते. मराठवाड्याच्या मुक्तीसाठी संघर्ष करणाऱ्या आणि आपल्या प्राणांची आहुती देणाऱ्या सर्व ज्ञात-अज्ञात स्वातंत्र्यसैनिकांना या दिनी विनम्र अभिवादन! त्यांच्या त्यागाची आणि शौर्याची गाथा पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचविणे हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल.

मराठवाडा मुक्ती संग्रामातील सर्व स्वातंत्र्यसैनिकांना मानाचा मुजरा! सर्व मराठवाडावासीयांना मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाच्या हार्दिक शुभेच्छा!

**– श्याम ठाणेदार**

# सण-उत्सवांच्या एकत्रिकरणाची ताकद समाजहितासाठी वापरा

आपले सण ही आपल्या संस्कृतीची ओळख आहे. त्यामागे श्रद्धा, इतिहास, परंपरा आहे आणि समाजाला एकत्र आणण्याची ताकद आहे.आज आपण बघतो अगदी पाचशे लोकसंख्या असलेल्या खेड्यातील लोकसूद्धा तेथील लोकसमूहातील धर्म जात पंथ याला अनुसरून एकत्रित येऊन मंडळ स्थापित करुन आपपली श्रद्धा, परंपरा लक्षात घेऊन उत्सव साजरे करतात. कधी न एकत्रित आलेले तेवढे ठराविक दिवस एकत्रित येतात व उत्सव साजरा करतात. उत्सवादरम्यान प्रसन्न आनंदी असतात. एकजुटीने मोठयातील मोठं कार्य पाडतात. कारण यापाठीमागे आपली त्या उत्सावाबद्दल मनात असलेली अपार श्रद्धा असते. या श्रद्धेच्या जोरावर आपण ते भला मोठा उत्सव साजरा करतो. हे सर्व एका व्यक्तीकडून शक्य नसते मात्र तेच आपण मोठ्यातलं कार्य ऐकीच्या बळातून सहज सोपं व सुलभपद्धतीने करतो. त्यातून मिळणारी समाजासाठी एकत्रितपणाची ही तर त्याहूनही अजून आनंदाची बाब असते.



आपला भारत देश बहुधर्मिय, बहूजातीय, बहूपंथीय आहे विविध परंपरेने नटलेला आहे. या विविधतेतही एकता दिसून येते. मात्र, हल्ली या विविधतेतील ऐकतेला कुठेतरी गालबोट लागतांना दिसून येते. याचे अनेक कारणे असू शकतात. परंतु या सण उत्सव साजरे करण्यामागील स्पर्धा एक कारण जास्त बांधक ठरत आहे. या मंडळापेक्षा ते मंडळ छान, तेथील देखावे, तेथील सेलिब्रेटी लोकांच्या भेटीमुळे तेथील अवास्तव वाढलेली गर्दी यामुळे त्या ठिकाणी व्यवहारीदृष्टिकोन निर्माण झाला आहे. सण उत्सव साजरे करण्यामागील मूळ उद्देश जसे कि, एकसंघ पणा, समाजहीत, भक्ती, परंपरा संस्कृतीची जोपासना हे कुठेतरी दूर जातांना दिसत आहे.

आपल्या भारतीय परंपरेप्रमाणे वर्षाकाठी जेवढेही सण - उत्सव साजरे केल्या जातात. या उत्सवादरम्यान सर्वात जास्त योगदान असते ते तरुनाईच...! कारण कठीणातील कठीण व मोठमोठं कार्य कार्य करण्याची शक्ती ही तरुण पिढीत असते. परंतु आज कुठेतरी ही तरुण पिढी भरकटतांना दिसते.या उत्सवाच्या निमित्ताने एकत्रित येऊन एक मंडळ दुसऱ्या मंडळाशी वाद घालतेय, अति कर्णकर्कश आवाज,अतिरिक्त विजेची रोषणाई, प्लास्टिकचा वापर, अति प्रमाणात सजावट, मिरवणूकि दरम्यान अश्लील डान्स, मद्यप्रशान वगैरे या अश्या कृत्यामुळे सण साजरा करण्यामागील मूळ उद्देश बाजूला राहतो व त्यातून समाजात तेढ निर्माण होते. व समाजविघातक कार्य घडण्याची शक्यता असते.मग मनाला कुठेतरी एक प्रश्न पडतो कि, आपण सण साजरे करतोय की सणाच्या नावाखाली विषमता पसरावतोय. मित्रांनो याठिकाणी सणांना विरोध करण्याचा प्रश्नच नाही. आपले सण ही आपल्या संस्कृतीची ओळख आहेत. मात्र, सण बदलू नका विचार बदला. आपल्याला परंपरा सोडायच्या नाहीत. आपल्याला संस्कृती विसरायची नाही.

आपल्याला श्रद्धा सोडायची नाही. पण श्रद्धेला विवेकाची जोड द्यायची आहे. परंपरेला परिवर्तनाची दिशा द्यायची आहे. उत्सवाला सामाजिक जबाबदारीची किनार द्यायची आहे.कारण तरुणाईने जर सणांकडे नव्या नजरेने पाहिले, तर प्रत्येक सण समाजासाठी काहीतरी चांगले करण्याची संधी ठरू शकतो. बदलत्या काळानुसार विचार बदलणे महत्त्वाचे आहे; पण विचार कृतीत उतरला तरच परिवर्तन घडते. म्हणून प्रत्येक तरुणाने सणाच्या काळात समाज हिताचे उपक्रम राबवण्याचा संकल्प करावा. जसे कि, एक सण -एक सामाजिक उपक्रम' प्रत्येक सणाला मित्रांचा छोटा गट तयार करून एक सामाजिक उपक्रम राबवावा यातून अन्नदान, रक्तदान, स्वच्छता मोहीम, वृक्षारोपण किंवा गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप ई छोटे छोटे व अगदी कमी खर्चिक उपक्रम राबवता येईल.

**दुसरे असे कि,दिखाव्याऐवजी गरजुंना मदत जसे कि,**

अति प्रमाणातील सजावट, डीजे, फटाके किंवा अनावश्यक खर्चासाठी ठरवलेल्या पैशांपैकी किमान काही हिस्सा गरजू व्यक्ती किंवा सामाजिक संस्थेसाठी राखून ठेवावा.

**तिसरे असे कि,**

'एक तरुण -एक मदतीचा हात'सणाच्या दिवशी आपल्या परिसरातील एखाद्या गरजू कुटुंबाची माहिती घेऊन त्यांना अन्नधान्य, कपडे, पुस्तके किंवा आवश्यक वस्तू द्याव्यात. **चवथे असे कि,**

सण-उत्सव पर्यावरणपूर्वक साजरा करावा यातून प्लास्टिकचा अनावश्यक वापर टाळावा, स्थानिक व पुनर्वापर करता येणाऱ्या सजावटीचा वापर करावा आणि शक्य तिथे पर्यावरणपूरक पद्धतीने सण साजरा करावा.

**पाचवे असे कि,** जल्लोष करताना लहान मुले, वृद्ध, आजारी व्यक्ती, विद्यार्थी आणि प्राणी यांचा विचार करावा. आनंद आपला असला तरी त्रास दुसऱ्याला होणार नाही,

**याची जबाबदारी घ्यावी सहावे असे कि,** हल्ली सोशल मीडिया'चा वापर सकारात्मक दृष्टीने करावा फक्त स्वतःचे फोटो आणि महागड्या खरेदीचे प्रदर्शन करण्याऐवजी सामाजिक उपक्रमांची माहिती शेअर करावी आणि इतर तरुणांनाही सहभागी होण्यासाठी प्रेरित करावे.

**सातवे असे कि,** स्थानिकांकडून खरेदी करावी. मोठ्या ब्रँडच्या वस्तू खरेदी करण्याबरोबरच आपल्या परिसरातील छोटे दुकानदार, कारागीर, कुंभार, हस्तकला करणारे आणि स्थानिक व्यावसायिक यांच्याकडूनही खरेदी करावी. **आठवे असे कि,**

'सणासाठी जमा वर्गणी ही समाजहितनिधी म्हणून वापरावी. प्रत्येकाने आपल्या इच्छेनुसार थोडी रक्कम जमा करून तिचा उपयोग एखाद्या विद्यार्थ्याच्या शिक्षणासाठी किंवा गरजू कुटुंबाच्या मदतीसाठी करावा.. एका गरजू विद्यार्थ्याची जबाबदारीमित्रमंडळींनी मिळून एखाद्या विद्यार्थ्याच्या पुस्तकांचा, वह्यांचा किंवा शैक्षणिक साहित्याचा खर्च उचलावा. एका सणाचा खर्च एखाद्याच्या वर्षभराच्या शिक्षणाला हातभार लावू शकतो. उत्सव मंडळांनी सामाजिक उद्दिष्ट स्वीकारावे. तरुणांनी उत्सव मंडळांच्या माध्यमातून केवळ सजावट आणि मनोरंजनावर भर न देता आरोग्य शिबिरे, रक्तदान, करिअर मार्गदर्शन, व्यसनमुक्ती जनजागृती, महिला सुरक्षा आणि पर्यावरण संवर्धन यांसारखे उपक्रम राबवा हेच छोटे संकल्प, समाजपरिवर्तनाचे मोठे बदल घडवून आणू शकतात. प्रत्येक तरुणाने व समाजातील प्रत्येक व्यक्तीने स्वतःला फक्त काहि प्रश्न विचारावे जसे कि, मी किती खर्च करणार? त्यातील किती खर्च खरोखर आवश्यक आहे? माझ्या सणामुळे पर्यावरणाला किती नुकसान होणार? माझ्या आनंदात एखादा गरजू सहभागी होणार आहे का? या सणानंतर माझ्यामुळे समाजात काही सकारात्मक बदल होणार आहे का? या काहि प्रश्नांची प्रामाणिक उत्तरेच सणाला वी दिशा देऊ शकतात.

मित्रांनो, शेवटी एकच सांगावंस वाटतं या सणानंतर आपल्या घरातील दिवे विझतील, सजावट उतरवली जाईल, डीजे बंद होईल आणि सोशल मीडियावरील पोस्ट खाली जातील. मात्र आपल्या सणामुळे एखाद्याच्या आयुष्यात कायमचा प्रकाश पडला का? हा प्रश्न प्रत्येक तरुणाने स्वतःला विचारला पाहिजे. कारण सणाची खरी श्रीमंती आपण किती खर्च केला यात नसते; आपण किती माणसं जोडली यात असते. एक माणूस म्हणून आपण किती जणांच्या समाजहीत उपक्रमांच्या माध्यमातून चेहऱ्यावर हास्य फुलवले. हे महत्वाचे आहे. म्हणून सण साजरा करा. मात्र असा करा की, तुमच्या आनंदामुळे दुसऱ्याच्या डोळ्यात पाणी नव्हे, तर चेहऱ्यावर हास्य फुलवले पाहिजे. हीच आधुनिक तरुणाईची नवी संस्कृती हीच सणांची खरी समता आणि हीच माणुसकीची खरी ओळख..! म्हणून हेच सण- उत्सवानिमित्त एकत्रित आलेला समाजाने स्थापित केलेल्या मंडळ, ग्रुपच्या माध्यमातून समाजहिताचे उपक्रम राबवा. सण म्हणजे केवळ नवीन कपडे, सजावट, मोठमोठे आवाज, महागड्या पार्ट्या आणि सोशल मीडियावरील फोटो नव्हेत. सण म्हणजे आपल्या संस्कृतीशी जोडणारा, नाती घट्ट करणारा आणि समाजात आनंद वाटणारा उत्सव.

आजची तरुणाई ही देशाची ऊर्जा आहे. त्यामुळे सणांकडे पाहण्याची तिची दृष्टीही समाजाला दिशा देणारी असायला हवी. उत्सव असावा, पण उधळपट्टी नको.श्रद्धा असावी, पण अंधानुकरण नको. जल्लोष असावा, पण इतरांना त्रास नको. परंपरा जपावी, पण पर्यावरणाची हानी होणार नाही याची काळजी घ्यावी. हा नवीन दृष्टिकोन गावागावातील, शहरा-शहरातील सण-उत्सवानिमित्त एकत्रित जमलेल्या मंडळातील तरुणांनी मनी बाळगायला हवा.

**– श्री. विनोद शेनफड जाधव**
**मासरूळ जि.बुलडाणा**
**मो.नं.९७६३२८२०७७**

## मेडल

मिळते जेंव्हा मेडल
सुरू सर्वत्र जयघोष
कौतुके करी वर्षाव
नाचे आनंदे बेहोश

चुकूनचुकता पदक
सुरू कसा आक्रोश
लोक सोडे टिकास्त्र
उसळतो किती रोष

टाळ्या बडवणारेचं
द्याया लागती दोष
अशा केल्यास चुकां
ठणाणा न् कंठशोष

खेळाडूंना टोचताना
मिळे असूरी संतोष
असेचं आहेत साले
खुले शिव्यांचा कोष

सुविधा हव्या द्यायले
कितीकाळ कंठशोष
टांगती तलवार नको
मैदानेअसावी सपोश

कसे फुलती खेळाडू
कसे आणती जोश
आमचे धोरणकारण
खेळाडूंना उगा दोष

जय पराजय सारखे
कायमठेवावा संतोष
खिलाडूवृत्तीसमहत्व
खेळ असावा निर्दोष

**– हेमंत मुसरीफ, पुणे**
**९७३०३०६९९६**

अक्षराज
अचूक वेध, अचूक बातमी

# बाप्पांच्या निरोपासाठी वाटल्याडाळीची
# वेगळ्या पद्धतीने बनवलेली उसळ !

गणपती बाप्पांच्या उत्सवात उत्साहात दिवस कसे झरकन निघून गेले लक्षातही नाही आले. आता बाप्पांच्या जाण्याची गडबड! दररोज त्यांच्या आवडीचे तर्हे तर्हेचे गोड पदार्थ, मोदक बनवले. आता निरोप देतेवेळी त्यांच्या आवडीची खमंग, चटपटीत अशी वाटल्या डाळीची खास उसळ आपण बनवतो. आजही बनवूया, पण थोडीशी वेगळ्या खास पद्धतीने!



**साहित्य :**

१वाटी हरभरा डाळ, सुक्या खोबऱ्याचा किस पाव वाटी, कोथिंबीर, लाल तिखट, मीठ, साखर, लिंबू, आवडीनुसार चवीप्रमाणे कमीजास्त, कढीपत्ता, फोडणीचे साहित्य, तेल, खोवलेला नारळ पाव वाटी.

**कृती :** प्रथम हरभऱ्याची डाळ ७-८ तास छान भिजवून घ्यावी. नंतर त्यातील पाणी चाळणीतून काढून प्रेशरकुकर मधे ठेवून मोठ्या गॅसवर २ शिट्ट्या काढव्यात. मग बाहेर काढल्यावर थोडी थंड झाली की मिक्सर मधून जाडसर वाटून घ्यावी. कढई मध्ये डावभर तेल घालून मोहरी, जीरे, हिंग, कढीपत्ता, हळद घालून मस्त फोडणी करून त्यात वाटलेली डाळ घालून ती छान परतावी. नंतर त्यात तिखट, मीठ, कोथिंबीर, चवीसाठी २ चमचे साखर घालून खोबऱ्याचा कीस घालून व्यवस्थित परतून वाफ द्यावी. शेवटी सर्व्हिंग बाऊलमधे काढून त्यावर ओला नारळ, कोथिंबीर घालून वर लिंबाची फोड ठेवून द्यावी.

**वैशिष्ट्य :** डाळ कुकर मधे अर्धवट वाफवून मग मिक्सर मधून वाटून बनवल्यामुळे तेल कमी लागते, लवकर होते आणि ओलसर व नरम होते. खमंग होते. वरून ज्यांना आवडत असेल तर लिंबू पिळावे. लाल तिखट घातल्यामुळे जास्त खमंग होतेच, शिवाय पोटाच्या आरोग्यासाठी पण योग्य असते. हिंग, कधीपत्ता, खोबरे यांचा खूप छान खमंग चव आणि नारळाचाही खास स्वाद खुपच सुरेख येतो. लिंबू आणि साखरेमुळे किंचीत खट्टीमिठी डाळ चटपटीत लागते. बाप्पा दीड दिवसापासून ते अनंत चतुर्दशी पर्यंत प्रथेनुसार प्रत्येकांच्या घरचे विसर्जन करतात. बरेच ठिकाणी गौरीच्या सोबतच बाप्पाचं विसर्जन करतात. गणपतीलाआवडणारी ही टेस्टी उसळ दरवर्षी गणपती विसर्जनाला सर्वजण आवर्जून करतात. अशी बनवल्यामुळे ओलसरपणा असल्यामुळे खाताना तोठरे बसत नाहीत. नक्की या पद्धतीने एकदा बनवून तरी पहा. एरवी सुद्धा मधल्यावेळी खाण्यासाठी खूप छान पर्याय आहे.

**– सौ.स्नेहा मुसरीफ, पुणे.**

# मला लाज वाटते, असे म्हणण्याची वेळ का आली ?

मुंबई - गोवा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६६ मागील १७ वर्षांपासून तयार होतो आहे. केंद्रीय सार्वजनिक बांधकाम मंत्री नितीन गडकरी यांनी अनेक वर्षांपासून अनेक रस्त्याचे बांधकाम पूर्ण करण्याच्या तारखा जाहीर केल्या. गुरुवारी गोव्यात बोलताना उघडपणे नाराजी व्यक्त केली. मुंबई - गोवा राष्ट्रीय महामार्गाच्या बांधकामाला झालेल्या निलंबनाची मला लाज वाटते.असे म्हणण्याची वेळ का आली. रस्ता लवकर बांधून पूर्ण व्हावा म्हणून स्थानीक नागरीकांनी आंदोलने केली, तालुका निहाय पत्रकार संघाच्या पत्रकारांनी आंदोलने केली.तरीही परिस्थिती जेसे थे आहे.गडकरी कधी म्हणाले स्थानिक लोकप्रतिनिधी कंत्राटदारांना आडवे येतात त्यांची मी नावे जाहीर करीन पण एवढ्या वर्षात नावे जाहीर केली नाहीत. गडकरी महाराष्ट्रातील मोठे नेते आहेत. त्यांच्या बोलण्यावर जनता विश्वास ठेवून होती. पण त्यांची आश्वासने पूर्ण झाली नाहीत. रस्ता बांधकाम पूर्ण झाले नसताना टोल नाकी तयार झाली. मुंबई - गोवा राष्ट्रीय महामार्ग तयार करण्यात आधी ह्या परिसरात वन संपत्ती होती. मोठ - मोठे दगड होते, माती होती.त्यांचे मूल्य शासनाच्या तिजोरीत जमा झाले.असे असताना टोल नाकी का हवी. कंत्राटदार हा काही लेचापेचा नसतो. कामापोटी शासनाकडे अनामत रक्कम जमा करतो. कोकण विकास हा या रस्त्यात दडलेला आहे. म्हणून जाणीव पूर्वक हेटाळणी केली जाते आहे का असा प्रश्न पडतो. कोकणातील निसर्ग हाच कोकणाचे वरदान आहे.मुंबई - गोवा राष्ट्रीय महामार्गा नंतर हाती घेतलेले प्रकल्प सुरू झाले. मग, कोकणातील गणेशोत्सव खाचखळग्यातूनच साजरा व्हावा असे वाटते का? २५ लाखांहून अधिक लोक गणेशोत्सवात कोकणात आले रस्त्यावरचे अडथळे दूर करून. गडकरींची हतबलता बरेच काही सांगून जाते.

**– महादेव गोळवसकर**
**मुंबई**
**९८६९४७६२०९**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

## थोडक्यात बातम्या

# ज्ञानवर्धिनीमुळे शिष्यवृत्ती परीक्षेला नवी दिशा - रा.ह.दरे

## ढोकेश्वर विद्यालयाच्या दोन विद्यार्थिनींचे जिल्ह्यात नेत्रदीपक यश



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१६, पारनेर (अहिल्यानगर) :** ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये स्पर्धा परीक्षेची गोडी निर्माण व्हावी आणि सातवी शिष्यवृत्ती परीक्षेची पायाभरणी पक्की व्हावी, या हेतूने आम्ही २२ वर्षांपूर्वी ज्ञानवर्धिनी स्पर्धा परीक्षा सुरू केली. या परीक्षेमुळे शिष्यवृत्ती परीक्षेला नवी दिशा मिळत आहे, असे प्रतिपादन अ.नगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाजाचे अध्यक्ष रा.ह.दरे यांनी केले. अहिल्यानगर येथील जिल्हा मराठा विद्या प्रसारक संस्थेच्या ग्रंथालय हॉलमध्ये ज्ञानवर्धिनी स्पर्धा परीक्षा गुणगौरव व शिष्यवृत्ती वितरण सोहळ्यात ते अध्यक्षस्थानावरून बोलत होते. यावर्षीच्या परीक्षेत टाकळी ढोकेश्वर येथील श्री ढोकेश्वर विद्यालयाने घवघवीत यश मिळवले आहे. विद्यालयाची कु. वैभवी सुमित कटारिया हिने ३००पैकी २८२ गुण मिळवत जिल्ह्यात ९ वा क्रमांक, तर कु. आराध्या अमित कडुसकर हिने ३०० पैकी २७४ गुण मिळवत जिल्ह्यात १३ वा क्रमांक पटकावला. या दोन्ही गुणवंत विद्यार्थिनींना मान्यवरांच्या हस्ते ट्रॉफी, प्रशस्तीपत्रक व रोख शिष्यवृत्ती देऊन गौरविण्यात आले.

यावेळी जिल्ह्यातील इयत्ता सहावीच्या ५४ व सातवीच्या ३७ गुणवंत विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचे वाटप करण्यात आले. यामध्ये सहावीतील गुणवत्तेनुसार १७ व सातवीतील २१ विद्यार्थ्यांना प्रत्येकी एक हजार रुपयांची शिष्यवृत्ती देण्यात आली. ही शिष्यवृत्ती अध्यक्ष रा. ह. दरे हे दरवर्षी आपल्या मातोश्री कै. भिवंराबाई हरिभाऊ दरे यांच्या स्मृतीप्रित्यर्थ देतात. याच सोहळ्यात इयत्ता पाचवी व सहावीसाठी तयार केलेल्या ज्ञानवर्धिनी सराव पुस्तकांचे प्रकाशन करण्यात आले. पुस्तक लेखन करणारे पर्यवेक्षक बाळासाहेब निवडुंगे, बाबासाहेब जाधव व अतुल सैद या शिक्षकांचा विशेष सत्कार करण्यात आला. कार्यक्रमास संस्थेचे सचिव ॲड. विश्वासराव आठरे पाटील, खजिनदार ॲड. दिपलक्ष्मी म्हसे, ज्येष्ठ विश्वस्त जी. डी. खानदेशी, विश्वस्त जयंत वाघ, रेसिडेन्शियल प्राचार्य विजय जाधव, उपप्राचार्य दादासाहेब वांढेकर, ढोकेश्वर विद्यालयाचे प्राचार्य बाळासाहेब खिलारी, विविध शाळांचे मुख्याध्यापक, शिक्षक व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. दरम्यान, या यशाबद्दल संस्थेचे माजी अध्यक्ष नंदकुमार झावरे, ज्येष्ठ विश्वस्त सिताराम खिलारी (आण्णा) व गव्हर्निंग कौन्सिल सदस्य डॉ. भाऊसाहेब खिलारी यांनी विद्यार्थिनी व शिक्षकांचे अभिनंदन केले आहे.

# पिंप्रीत 'एक गाव, एक गणपती'चा सामाजिक एकोप्याचा संदेश



**अक्षराज : नंदकुमार बोरसे**

**दि.१६, शिरपुर (धुळे) :** सामाजिक ऐक्य, बंधुभाव आणि गावाच्या एकजुटीचा संदेश देत पिंप्री येथे 'एक गाव, एक गणपती' या संकल्पनेतून गणेशोत्सव साजरा केला जात आहे. गावातील पदाधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली गावातील तरूणांनी एकत्र येत युवा प्रतिष्ठानच्या पुढाकारातून आयोजित करण्यात आलेल्या श्री गणरायाच्या महाआरतीस गणेशभक्तांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. वटकेश्वर महादेव मंदिर प्रांगणात सोमवारी सायंकाळी महाआरती भक्तिमय वातावरणात संपन्न झाली.गावातील विविध भागांतील गणेशभक्तांनी एकत्र येत सामूहिक गणेशोत्सवाला दिलेला प्रतिसाद हा पिंप्रीच्या सामाजिक एकोप्याचे दर्शन घडवणारा ठरला. 'एक गाव, एक गणपती' या संकल्पनेतून उत्सवातील अनावश्यक खर्चाला आळा घालण्यासोबतच गावकऱ्यांनी एकत्रितपणे सामाजिक व विधायक उपक्रम राबवावेत, असा संदेश या उपक्रमातून देण्यात आला.महाआरती दरम्यान परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते. गणेशभक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून श्री गणरायाचे दर्शन घेतले. सामूहिक सहभागामुळे यंदाच्या गणेशोत्सवाला सामाजिक बांधिलकीची किनार लाभली आहे.पोलीस पाटील जयपालसिंह गिरासे यांनी यावेळी प्रतिक्रिया देताना सांगितले, 'एक गाव, एक गणपती' ही केवळ गणेशोत्सवाची संकल्पना नसून गावाच्या एकजुटीचे आणि सामाजिक सलोख्याचे प्रतीक आहे. विविध विचारांचे आणि विविध क्षेत्रांत कार्यरत असलेले गावकरी एका व्यासपीठावर एकत्र येऊन उत्सव साजरा करीत आहेत, ही पिंप्रीच्या दृष्टीने अभिमानाची बाब आहे. या उपक्रमातून अनावश्यक खर्चाला आळा बसण्याबरोबरच सामाजिक, सांस्कृतिक आणि विधायक उपक्रमांना चालना मिळू शकते. गणेशोत्सव शांतता, शिस्त आणि बंधुभावाने साजरा करून पिंप्रीने 'एक गाव, एक गणपती'चा आदर्श निर्माण करावा. युवा प्रतिष्ठानच्या या उपक्रमाचे ग्रामस्थांकडून स्वागत होत असून, सामूहिक गणेशोत्सवाच्या माध्यमातून गावातील एकोपा अधिक दृढ करण्याचा प्रयत्न यंदाच्या उत्सवाचे वैशिष्ट्य ठरत आहे.

# गौरी विसर्जनाला मधमाशांचा 'डंख'; सावलीत ८ महिला जखमी, तर कोठारीतही थरार




**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि. १६ चंद्रपूर :** गौरी विसर्जनासाठी तलाव व नाल्याच्या परिसरात गेलेल्या महिलांवर मधमाशांच्या मोठ्या थव्याने (झुंडाने) अचानक हल्ला केल्याच्या २ घटना मंगळवारी सकाळी घडल्या. सावली येथील गाव तलाव परिसरातील हल्ल्यात आठ महिला जखमी झाल्या, तर कोठारी परिसरातही अनेक महिलांना मधमाशांनी दंश केला. अचानक झालेल्या हल्ल्यामुळे गौरी विसर्जनाचा विधी अर्धवट सोडून महिलांना जीव वाचविण्यासाठी सुरक्षित ठिकाणी धाव घ्यावी लागली.

सावली येथील गाव तलावावर सकाळी साडेआठ वाजताच्या सुमारास गौरी विसर्जनासाठी मोठ्या संख्येने महिला उपस्थित होत्या. तलावाच्या पाळीवर असलेल्या वडाच्या झाडावर मधमाशांचे मोठे मोहळ होते. अचानक या मोहळातून मधमाशांचा थवा (झुंड) बाहेर पडला आणि उपस्थित महिलांवर हल्ला केला. काही क्षणांतच परिसरात आरडाओरड आणि गोंधळ उडाला. मधमाशांपासून बचाव करण्यासाठी महिलांनी मिळेल त्या दिशेने धाव घेत सुरक्षित ठिकाण गाठण्याचा प्रयत्न केला. या हल्ल्यात वर्षा कोसरे, छाया कोसरे, रुपाली कोसरे, शीतल कोसरे यांच्यासह जवळपास ८ महिला जखमी झाल्या. जखमी महिलांवर स्थानिक पातळीवर उपचार करण्यात आले. हल्ल्यामुळे झालेल्या गोंधळात रुपाली कोसरे यांचा सोन्याचा दागिना हरवल्याची माहिती असून तो नेमका कुठे पडला याचा शोध घेतला जात आहे.

**कोठारीतही मधमाशांचा थवा महिलांवर तुटून पडला : -**

दरम्यान, कोठारी परिसरातही गावालगतच्या नाल्याजवळ गौरी विसर्जनासाठी गेलेल्या महिलांवर मधमाशांच्या मोठ्या थव्याने (झुंडाने) अचानक हल्ला केला. गौरी पूजनानंतर पारंपरिक पद्धतीने विसर्जनाचा विधी सुरू असतानाच मधमाशा महिलांच्या दिशेने आल्या आणि काही क्षणांतच त्यांनी महिलांना दंश करण्यास सुरुवात केली. अचानक झालेल्या हल्ल्यामुळे महिलांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले. बचावासाठी महिलांनी आरडाओरड करत सुरक्षित ठिकाणी धाव घेतली. काही महिलांनी नाल्यातील गौरी तशाच सोडून स्वतःचा जीव वाचविण्यासाठी तेथून पळ काढला. या घटनेत अनेक महिलांना मधमाशांनी दंश केल्याने त्यांना उपचारासाठी नेण्यात आले.

**विसर्जनस्थळी खबरदारी घेण्याची गरज : -**

गौरी विसर्जनासाठी मोठ्या संख्येने नागरिक एकत्र येत असलेल्या तलाव, नाले आणि सार्वजनिक विसर्जनस्थळांच्या परिसरात मधमाशांचे मोठे मोहळ असल्यास आवश्यक खबरदारी घेणे गरजेचे आहे. अशा ठिकाणी असलेली धोकादायक मोहळे वेळीच हटवून भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी संबंधित यंत्रणेने तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

# १९, २०, २६ व २७ सप्टेंबरला सर्व मतदान केंद्रावर आयोजन मतदार नोंदणीसाठी ४ दिवस विशेष शिबीरे

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.१६, चंद्रपूर :** विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रम-२०२६ अंतर्गत पात्र नागरिकांना मतदार यादीत नाव नोंदविण्याची संधी उपलब्ध करून देण्यासाठी चंद्रपूर जिल्ह्यातील सर्व विधानसभा मतदारसंघांतील मतदान केंद्रांवर १९, २०, २६ आणि २७ सप्टेंबर २०२६ रोजी विशेष मतदार नोंदणी शिबिरांचे आयोजन करण्यात आले आहे. नागरिकांनी या विशेष मोहिमेचा लाभ घेऊन मतदार यादीतील आपली नोंद अद्ययावत करावी, असे आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी वसुमना पंत यांनी केले आहे. भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार मतदार यादीच्या विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रमांतर्गत नागरिकांकडून नवीन मतदार नोंदणी, मतदार यादीतील नोंदींमध्ये दुरुस्ती तसेच नाव वगळण्यासाठी अर्ज स्वीकारण्यात येत आहेत.

१ ऑक्टोबर २०२६ रोजी किंवा त्यापूर्वी १८ वर्षे पूर्ण करणाऱ्या युवक-युवतींना मतदार यादीत नाव समाविष्ट करण्याची संधी उपलब्ध आहे. तसेच गैरहजर, स्थलांतरित अथवा अन्य कारणांमुळे प्रारूप मतदार यादीत नाव समाविष्ट नसलेल्या पात्र नागरिकांना त्यांच्या सध्याच्या सर्वसाधारण रहिवासाच्या ठिकाणी नव्याने नाव नोंदविता येणार आहे. सकाळी १० ते सायंकाळी ६ पर्यंत शिबिरे जिल्ह्यातील सर्व विधानसभा मतदारसंघांतील सर्व मतदान केंद्रांवर शनिवार १९ सप्टेंबर, रविवार २० सप्टेंबर, शनिवारी २६ सप्टेंबर आणि रविवार २७ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी १० ते सायंकाळी ६ या वेळेत विशेष शिबिरे आयोजित करण्यात येणार आहेत. या दिवशी संबंधित मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ) मतदान केंद्रांवर उपस्थित राहतील. नागरिकांकडून नवीन मतदार नोंदणीसाठी नमुना ६, नाव वगळण्यासाठी नमुना ७ तसेच दुरुस्ती व स्थलांतरासाठी नमुना ८ मधील अर्ज स्वीकारण्यात येतील. विशेषतः महिला आणि दिव्यांग व्यक्तींच्या मतदार नोंदणीला प्राधान्य देण्यात येणार आहे.

शाळा - महाविद्यालयांतही विशेष नोंदणी १ ऑक्टोबर २०२६ या अर्हता दिनांकानुसार १८ वर्षे पूर्ण करणाऱ्या युवक-युवतींची जास्तीत जास्त मतदार नोंदणी व्हावी, यासाठी सुट्टीचे दिवस वगळता कार्यालयीन वेळेत जिल्ह्यातील शाळा व महाविद्यालयांमध्येही विशेष नोंदणी शिबिरांचे आयोजन करण्यात येणार आहे. लोकशाही प्रक्रियेत प्रत्येक पात्र नागरिकाचा सहभाग महत्त्वाचा आहे. त्यामुळे जिल्ह्यातील पात्र नागरिक, विशेषतः नवमतदार युवक-युवतींनी आपल्या संबंधित मतदान केंद्रावर जाऊन मतदार यादीत नाव असल्याची खात्री करावी. नाव नसल्यास आवश्यक अर्ज भरून मतदार नोंदणी करून घ्यावी आणि या विशेष मोहिमेचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी वसुमना पंत यांनी केले आहे.

# ग्रामीण युवकांसाठी जुन्या पोलीस ठाण्यात मोफत अभ्यासिका

## पोलीस निरीक्षक दिनकर गोरे यांचा पुढाकार; स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन शिबिरांचेही नियोजन



**अक्षराज : पूनम परदेशी**

**दि.१६, सोयगाव (छ.संभाजीनगर) :** ग्रामीण भागातील युवकांना स्पर्धा परीक्षांच्या तयारीसाठी शांत, शिस्तबद्ध आणि पोषक वातावरण उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने सौयगाव पोलीस प्रशासनाच्या वतीने जुन्या पोलीस ठाण्याच्या इमारतीत मोफत अभ्यासिका सुरू करण्याचा उपक्रम हाती घेण्यात येणार आहे. पोलीस निरीक्षक दिनकर गोरे यांनी हा संकल्प व्यक्त केला असून, पोलीस भरती, एमपीएससी तसेच विविध शासकीय व स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांना या उपक्रमाचा लाभ होणार आहे.ग्रामीण भागातील अनेक विद्यार्थी आर्थिक अडचणींमुळे किंवा अभ्यासासाठी योग्य सुविधा उपलब्ध नसल्याने स्पर्धा परीक्षांच्या तयारीत अडथळ्यांना सामोरे जातात. ही बाब लक्षात घेऊन विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी स्वतंत्र आणि शांत जागा उपलब्ध करून देण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

अभ्यासासाठी आवश्यक सुविधा उपलब्ध होणारप्रस्तावित अभ्यासिकेत विद्यार्थ्यांना आवश्यक त्या शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. नियमित आणि एकाग्रतेने अभ्यास करता यावा, यासाठी पोषक वातावरण निर्माण करण्यावर भर दिला जाणार आहे.पोलीस भरतीसह एमपीएससी, विविध शासकीय भरती परीक्षा तसेच अन्य स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या युवकांना या अभ्यासिकेचा मोठा उपयोग होणार आहे. विद्यार्थ्यांना आवश्यक मार्गदर्शन मिळावे यासाठी संदर्भ पुस्तके, अभ्यास साहित्य आणि अन्य शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून देण्याचाही मानस व्यक्त करण्यात आला आहे.

मोफत मार्गदर्शन शिबिरांचे नियोजन अभ्यासिकेसोबतच स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी मोफत मार्गदर्शन शिबिरे आयोजित करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. पोलीस भरती, एमपीएससी आणि विविध शासकीय भरती परीक्षांचे स्वरूप, अभ्यासाचे नियोजन तसेच तयारीच्या विविध पैलूंबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन मिळावे, यासाठी तज्ज्ञांचे मार्गदर्शन उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. ग्रामीण भागातील युवकांना स्पर्धा परीक्षांच्या माध्यमातून शासकीय सेवेत जाण्यासाठी प्रोत्साहन मिळावे आणि त्यांना तयारीसाठी आवश्यक सुविधा स्थानिक पातळीवरच उपलब्ध व्हाव्यात, हा या उपक्रमामागील प्रमुख उद्देश आहे.

युवकांना शैक्षणिक व्यासपीठजुन्या पोलीस ठाण्याच्या इमारतीचा शैक्षणिक उपक्रमासाठी उपयोग करून युवकांना अभ्यासाची सुविधा उपलब्ध करून देण्याचा पोलीस प्रशासनाचा पुढाकार महत्त्वपूर्ण ठरणार आहे.बैठकीस पोलीस ठाण्यातील अधिकारी-कर्मचारी तसेच पत्रकार बांधव उपस्थित होते.

# राष्ट्रीय पोषण महा कार्यक्रमानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन




**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.१६, नागपूर :** नागपूर जिल्हा परिषदेच्या महिला व बालकल्याण विभागाच्या वतीने दरवर्षी राबविला जाणारा राष्टीय पोषण महा कार्यक्रमा निमित्त जेष्ठ नागरिकांचा वाढदिवस सोहळा भानेगाव येथे बुधवार, दिनांक १६ सप्टेंबर मोठ्या उत्साहात संपन्न झाला. मोरया चौक वार्ड क्रमांक ३ येथे चिचोली सर्कलच्या वतीने जेष्ठ नागरिकांच्या वाढदिवसाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून सरपंच शालिनी चवरे, चिचोली सर्कलच्या अंगणवाडी पर्यवेक्षिका मेघा भोयर, रविंद्र टापरे, प्रकाश वांडे आदि उपस्थित होते. गणेशोत्सव दरम्यान आयोजित करण्यात आलेल्या राष्ट्रीय पोषण महा कार्यक्रमा निमित्त आरोग्य व पोषण योजनांची माहिती देण्यात आली. याप्रसंगी वाढदिवसा निमित्त जेष्ठ नागरिक ८५ वर्षीय गोदूबाई गजानन वांढे व नागोराव गोमाजी बेलसरे यांचा केक कापून टाळ मृदुंगाच्या गजरात वाढदिवस साजरा करण्यात आला. यावेळी सरपंच शालिनी चवरे यांच्या हस्ते शाल श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी उपस्थित महिलांना पोषण आहाराचे महत्व पटवून सांगण्यात आले, शिवाय आरोग्य योजनांचा लाभ याबाबत माहिती विषद करण्यात आली. यावेळी दुर्गा भजन मंडळ बिना भानेगाव येथील महिला आवर्जून उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व संचालन पर्यवेक्षिका मेघा भोयर यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मेघा भोयर, अंगणवाडी सेविका दुर्गा डहाळे, मदतनीस मनिषा सोनेकर यांच्यासह अंगणवाडी सेविका यांनी सहकार्य केले.

# खापरखेड्यात आज श्री विश्वकर्मा जयंती पूजा समारोह



**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.१६, खापरखेडा (नागरपूर) :** दरवर्षीप्रमाणे यंदाही कॉन्ट्रॅक्टर असोसिएशन खापरखेडा तर्फे श्री भगवान विश्वकर्मा जयंती निमित्त पूजा उत्सवाचे आयोजन आज गुरूवार, दिनांक १७ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी ९ वाजता श्री राम मंदिर परिसर पोलीस स्टेशनजवळ खापरखेडा येथे विविध धार्मिक कार्यक्रमांतर्गत संपत्र होणार आहे. विश्वकर्मा भगवान हे सृष्टीचे दिव्य शिल्पकार, कारागीर, अभियंते व तंत्रज्ञानाचे आद्यगुरू मानले जातात, उद्योग, उद्योगधंदा, कार्यशाळा, यंत्रसामग्री तसेच सर्व प्रकारच्या कामकाजात सुरक्षितता, प्रगती आणि यश मिळावे. यासाठी या दिवशी भाविक पूजा अर्चना करतात.

स्थानिक कारागीर, मजूर, मेकेंनिक, वेल्डर, वाहन दुरूस्ती व्यवसायिक, हार्डवेअर व विविध व्यवसाय क्षेत्रांतील लोक मोठ्या संख्येने उपस्थित राहून पूजा अर्चना करणार असल्याची माहिती आयोजकांकडून देण्यात आली आहे. याप्रसंगी सकाळी ९ वाजता हवन व पूजन होणार असून त्यानंतर दुपारी १२ ते ३ या वेळेत सर्व भाविकांसाठी महाप्रसादाची व्यवस्था करण्यात आली आहे. तरी परिसरातील विश्वकर्मा भक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# दावे-हरकतींसाठी, ठाणे जिल्ह्यात विशेष शिबिरे

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.१६, ठाणे :** मतदार यादीतील नाव नोंदणी, दुरुस्ती व वगळणीसाठी दावे व हरकती दाखल करण्याचा कालावधी ३० सप्टेंबर २०२६ पर्यंत आहे. या पार्श्वभूमीवर ठाणे जिल्ह्यातील सर्व १८ विधानसभा मतदारसंघांमध्ये विशेष शिबिरांचे आयोजन करण्यात आले आहे.

शनिवार, दि.१९ व रविवार, दि.२० सप्टेंबर तसेच शनिवार, दि.२६ व रविवार, दि.२७ सप्टेंबर रोजी सकाळी १० ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत संबंधित मतदान केंद्रांवर नागरिकांना दावे व हरकती दाखल करता येतील.

दि.०१ ऑक्टोबर २०२६ रोजी किंवा त्यापूर्वी वयाची १८ वर्षे पूर्ण करणाऱ्या नवमतदारांसह प्रारूप मतदार यादीत नाव नसलेल्या पात्र नागरिकांना या शिबिरांमध्ये नाव नोंदणीची संधी उपलब्ध आहे. नाव नोंदणीसाठी नमुना ६, दुरुस्तीसाठी नमुना ८ आणि नाव वगळण्यासाठी नमुना ७, तसेच आवश्यक कागदपत्रे व घोषणापत्र सादर करावे लागेल.

विशेष शिबिरांमध्ये महिला व दिव्यांग नागरिकांच्या समावेशनाला प्राधान्य देण्यात आले आहे. जिल्ह्यातील सर्व पात्र नागरिकांनी या विशेष मोहिमेचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी केले आहे.

अक्षराज



# भोंद्रेचे माजी उपसरपंच मारुती (प्रकाश) झावरे यांचा अपघाती मृत्यू

## टाकळी ढोकेश्वर-पारनेर मार्गावरील जाधव वस्ती परिसरातील घटना; पिकअप चालकाविरुद्ध फिर्याद

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१६, पारनेर (अहिल्यानगर) :** टाकळी ढोकेश्वरपारनेर मार्गावर रस्त्यावर कोणतीही प्रकाशयोजना, रिफ्लेक्टर अथवा इशारा न देता उभ्या केलेल्या बोलेरो मॅक्स पिकअपला दुचाकीने पाठीमागून धडक दिल्याने भोंद्रे गावचे माजी उपसरपंच मारुती (प्रकाश) ठका झावरे (वय ४१) यांचा दुर्दैवी मृत्यू झाला. ही घटना ११ सप्टेंबर रोजी रात्री सव्वादहाच्या सुमारास जाधव वस्ती परिसरात घडली. याप्रकरणी अज्ञात पिकअप चालकाविरुद्ध टाकळी ढोकेश्वर पोलीस चौकीत फिर्याद दाखल करण्यात आली आहे.



पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मारुती झावरे हे शेती व्यवसायासह दूध संकलनाचे काम करीत होते. ते भोंद्रे गावच्या शिवारातील गट क्रमांक ३४७ मध्ये वास्तव्यास होते. त्यांच्या भावाच्या नावावर असलेली हिरो होंडा स्प्लेंडर प्रो मोटारसायकल (एमएच १६ एझेड १९५३) ते दैनंदिन कामासाठी वापरत होते. दिनांक ११ सप्टेंबर रोजी रात्री सव्वादहाच्या सुमारास शिक्षक असलेले त्यांचे बंधू बाळासाहेब झावरे हे टाकळी ढोकेश्वर येथील घरी असताना सुधाकर रामदास शेळके यांनी फोन करून मारुती यांचा टाकळी ढोकेश्वरपारनेर मार्गावर जाधव वस्ती जवळ अपघात झाल्याची माहिती दिली. जखमी मारुती यांना उपचारासाठी साई सावली हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आल्याचे समजल्यानंतर बाळासाहेब झावरे तातडीने तेथे पोहोचले.

मारुती यांच्या डोक्याला, कपाळाला तसेच डोक्याच्या मागील बाजूस गंभीर दुखापत झाली होती. ते बेशुद्ध अवस्थेत होते. यावेळी उपस्थित गणेश सूर्यभान झावरे यांनी अपघाताची माहिती दिली. त्यांच्या म्हणण्यानुसार, गणेश झावरे आणि मारुती झावरे हे वासुंदे चौकात भेटले होते.

काही वेळ गप्पा मारल्यानंतर दोघेही भोंद्रे येथे जाण्यासाठी निघाले. मारुती हे काही अंतरावर जात होते. जाधव वस्ती ओलांडल्यानंतर रस्त्यावर पारनेरच्या दिशेने तोंड करून महिंद्रा कंपनीची बोलेरो मॅक्स पिकअप उभी होती. या वाहनाला लाईट, रिफ्लेक्टर किंवा अन्य कोणत्याही प्रकारची खूण नसल्याने अंधारात ते वाहन दिसले नाही. त्यामुळे मारुती (प्रकाश) यांच्या दुचाकीची पिकअपला पाठीमागून जोरदार धडक झाली. यात ते रस्त्यावर पडून गंभीर जखमी झाले. नागरिकांच्या मदतीने त्यांना टाकळी ढोकेश्वर येथील साई सावली हॉस्पिटलमध्ये उपचारासाठी नेण्यात आले. प्राथमिक उपचारानंतर डॉक्टरांनी पुढील उपचारासाठी अहिल्यानगर येथे नेण्याचा सल्ला दिला. मात्र रस्त्यात मारुती यांच्या शरीराची कोणतीही हालचाल जाणवत नसल्याने त्यांना पुन्हा टाकळी ढोकेश्वर येथील ग्रामीण रुग्णालयात आणण्यात आले. डॉक्टरांनी तपासणी केल्यानंतर १२ सप्टेंबर रोजी मध्यरात्री १२.५० वाजता त्यांना मयत घोषित केले.

अपघातास कारणीभूत ठरलेल्या बोलेरो मॅक्स पिकअपचा क्रमांक एमएच १४ केयू ४१३७ असल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. रस्त्यावर वाहतुकीला अडथळा निर्माण होईल अशा स्थितीत कोणतीही प्रकाशयोजना अथवा सुरक्षा खूण न लावता वाहन उभे केल्यामुळे अपघात झाल्याचा आरोप फिर्यादीत करण्यात आला आहे.

या अपघातात मारुती (प्रकाश) यांच्या मृत्यूसह दुचाकीचेही नुकसान झाल्याचे नमूद करण्यात आले आहे. या प्रकरणी अज्ञात चालकाविरुद्ध पोलिसांनी फिर्याद दाखल करून पुढील तपास सुरू केला आहे.

# अहिल्यानगर जिल्ह्यातील ७५४ ग्रामपंचायतींवर पुन्हा प्रशासकराज

## मुदत संपलेल्या ग्रामपंचायतींसाठी सीईओ भंडारी यांचे आदेश; ६ महिन्यांसाठी नियुक्ती, निवडणूक होईपर्यंत कारभार सुरू

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१६, अहिल्यानगर :** जिल्ह्यातील मुदत संपलेल्या तब्बल ७५४ ग्राम पंचायतींचा कारभार आता पुन्हा प्रशासकांच्या हाती सोपविण्यात आला आहे. ग्रामपंचायतींच्या निवडणुका वेळेत घेणे शक्य न झाल्याने स्थानिक स्वराज्य संस्थांचा कारभार ठप्प होऊ नये, तसेच गावांमधील प्रशासकीय कामकाज आणि नागरी सुविधा सुरळीत सुरू राहाव्यात, यासाठी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी यांनी नवीन प्रशासक नियुक्तीचे आदेश काढले आहेत.

जानेवारी व फेब्रुवारी २०२६ मध्ये मुदत संपलेल्या ग्रामपंचायतींवर यापूर्वी सहा महिन्यांसाठी प्रशासक व प्रशासकीय समित्यांची नियुक्ती करण्यात आली होती. या नियुक्तीची मुदत २३ ऑगस्ट २०२६ रोजी संपली. त्यामुळे ग्रामपंचायतींचा कारभार प्रशासकीयदृष्ट्या विस्कळीत होऊ नये म्हणून शासनाच्या राजपत्रातील अधिसूचना आणि महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियमातील तरतुदींनुसार नवीन प्रशासक नियुक्त करण्यात आले आहेत.

या निर्णयामुळे जिल्ह्यातील ७५४ ग्रामपंचायतींमध्ये सरपंच व ग्रामपंचायत सदस्यांचा कार्यकाळ संपल्यानंतरचा प्रशासकीय कारभार आता नियुक्त अधिकाऱ्यांकडे राहणार आहे. ग्रामपंचायतींचे दैनंदिन कामकाज, विकासकामे, नागरिकांच्या मूलभूत सुविधा, विविध दाखले व प्रशासकीय मुदत संपलेल्या ग्राम पंचायतींचा कारभार प्रशासकीयदृष्ट्या सुरळीत राहणे आवश्यक आहे.

नागरिकांची कामे, ग्राम पंचायतींच्या मूलभूत सेवा आणि विकासकामांमध्ये कोणताही अडथळा निर्माण होऊ नये, यासाठी शासनाच्या तरतुदींनुसार प्रशासक नियुक्त करण्यात आले आहेत. संबंधित अधिकाऱ्यांनी ग्रामपंचायतींचा कार्यभार तत्काळ स्वीकारून नियमानुसार कामकाज करावे, अशी सूचना देण्यात आल्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी यांनी सांगितले.

निर्णयांची अंमलबजावणी यामध्ये खंड पडू नये, हा या नियुक्तीमागील प्रमुख उद्देश आहे. ग्रामपंचायतींच्या दैनंदिन प्रशासनासोबतच पाणीपुरवठा, स्वच्छता, रस्ते, दिवाबत्ती, आरोग्यविषयक सुविधा आणि सुरू असलेल्या विकासकामांना प्रशासकीय पाठबळ मिळण्याची अपेक्षा आहे.

**६ महिन्यांसाठी प्रशासकांची नियुक्ती**

शासनाच्या राजपत्रात प्रसिद्ध झालेल्या ८ सप्टेंबर २०२६ रोजीच्या अधिसूचनेनुसार ही नियुक्ती करण्यात आली आहे. प्रशासकांचा कार्यकाळ राजपत्रातील प्रसिद्धीच्या दिनांकापासून सहा महिने किंवा संबंधित ग्रामपंचायतींची प्रत्यक्ष निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत, यापैकी जे आधी होईल तोपर्यंत राहणार आहे. नियुक्त प्रशासकांना महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५९ तसेच संबंधित कायदे, नियम आणि जिल्हा परिषदेने वेळोवेळी दिलेल्या निर्देशांनुसार ग्राम पंचायतीचे कामकाज पाहावे लागणार आहे.

**रिक्त पदांमुळे विविध संवर्गातील अधिकाऱ्यांवर जबाबदारी**

जिल्ह्यात विस्तार अधिकारी पंचायतसह विविध संवर्गातील पदे रिक्त असल्याने प्रशासक नियुक्त करताना उपलब्ध मनुष्यबळाचा विचार करण्यात आला आहे. त्यामुळे विस्तार अधिकारी पंचायत, कृषी, सांख्यिकी, आरोग्य व शिक्षण विभागातील अधिकारी, तसेच सहाय्यक गट विकास अधिकारी, अंगणवाडी पर्यवेक्षिका, आरोग्य पर्यवेक्षक, कनिष्ठ अभियंता, शाखा अभियंता आणि सहाय्यक अभियंता यांच्यावरही ग्रामपंचायत प्रशासक म्हणून जबाबदारी सोपविण्यात आली आहे.

**मुदत संपलेल्या ग्रामपंचायती तालुकानिहाय संख्या**

पारनेर ८८, श्रीगोंदा ५९, शेवगाव ४८, कर्जत ५६, जामखेड ४७, अकोले ५२, संगमनेर ९४, कोपरगाव २९, राहाता २५, श्रीरामपूर २७, राहुरी ४४, नेवासा ५९, पाथर्डी ७८: एकूण ७५४

# के.रामलू पब्लिक स्कूलमध्ये गणेशोत्सव उत्साहात



**अक्षराज : दत्ता हमंद**

**दि.१६, कुंडलवाडी (नांदेड) :** स्थानिक के.रामलू पब्लिक स्कूल येथे दरवर्षीप्रमाणे या वर्षीही अत्यंत मनोभावाने आणि भक्तिमय वातावरणात गणपती बाप्पाची मोठ्या थाटामाटात स्थापना करण्यात आली आहे. श्रींच्या आगमनामुळे संपूर्ण शाळा परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

या वर्षी गणेशोत्सवाच्या संपूर्ण नियोजनाची विशेष जबाबदारी इयत्ता नववीच्या वर्गावर सोपवण्यात आली आहे. शाळेत दरवर्षी वेगवेगळ्या वर्गांना आरती आणि प्रसादाच्या व्यवस्थेचे नियोजन दिले जाते. त्यानुसार यंदा नववीचे वर्गशिक्षक दावलबाजे, लाड आणि त्यांचे विद्यार्थी या उत्सवात कोणतीही उणीव भासू नये. यासाठी दिवस-रात्र मेहनत घेत सर्व जबाबदारी अतिशय चोखपणे पार पाडत आहेत.

११ दिवस चालणाऱ्या या उत्सवात दररोज सकाळी आणि सायंकाळी शिक्षक, शिक्षिका व विद्यार्थी एकत्र येऊन मोठ्या भक्तीभावाने आरती व प्रसाद वाटपाचे नियोजन करत आहेत. आजच्या आरतीचा आणि प्रसादाचा मान इयत्ता ६ वी फाउंडेशनचे वर्गशिक्षक दत्ता हमंद व त्यांचे विद्यार्थी, तसेच इयत्ता ८ वीच्या शिक्षिका पूजा व त्यांच्या विद्यार्थ्यांना मिळाला. त्यांच्या हस्ते श्रींची आरती संपन्न होऊन प्रसादाचे वाटप करण्यात आले. या गणेशोत्सवाच्या निमित्ताने शाळेचे संस्थापक अध्यक्ष सायरेड्डी ठक्कुरवार, सचिव यशवंत संगमवार, संचालिका रमा ठक्कुरवार, प्रिंसिपल एस.जाधव, व्हाय प्रिंसिपल एम.सपना तसेच सर्व शिक्षक, शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विद्यार्थ्यांना गणेशोत्सवाच्या हार्दिक शुभेच्छा दिल्या. ११ दिवसांचा हा उत्सव अत्यंत आनंददायी आणि भक्तिमय वातावरणात पार पाडण्यासाठी सर्वजण उत्साहाने सहभागी झाले आहेत.

# बाबासाहेब कुणालजी पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त विद्यार्थ्यांची मोफत रक्तगट तपासणी

## शालेय साहित्य वाटपातून सामाजिक बांधिलकीचा जागर




**अक्षराज : नंदकुमार बोरसे**

**दि.१७, शिरपूर (धुळे) :** बिलाडी, ता.जि.धुळे : विद्यार्थ्यांचे आरोग्य सुदृढ राहावे आणि त्यांच्या शैक्षणिक वाटचालीला आवश्यक ते बळ मिळावे, या सामाजिक जाणिवेतून संस्थेचे एक्झिक्युटिव्ह कमिटीचे चेअरमन मा. बाबासाहेब कुणालजी पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त बिलाडी येथील जिल्हा परिषद शाळेत मोफत रक्तगट तपासणी व शालेय साहित्य वाटपाचा उपक्रम उत्साहात पार पडला. आरोग्य आणि शिक्षण या दोन्ही क्षेत्रांना एकाच उपक्रमातून जोडणाऱ्या या विधायक उपक्रमाचे ग्रामस्थ, शिक्षक, पालक व विद्यार्थ्यांनी कौतुक केले. या उपक्रमात जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांची मोफत रक्तगट तपासणी करण्यात आली. विद्यार्थ्यांना त्यांच्या रक्तगटाची माहिती मिळण्यासोबतच आरोग्यविषयक जागरूकता निर्माण करण्याचा प्रयत्न करण्यात आला. तसेच विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद फुलला आणि त्यांच्या शैक्षणिक वाटचालीला प्रोत्साहन मिळाले.

अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना प्राचार्य डॉ.एम.व्ही.पाटील यांनी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आरोग्य आणि शिक्षण या दोन्ही बाबींना समान महत्त्व देण्याची गरज व्यक्त केली. विद्यार्थ्यांनी आरोग्याची काळजी घेत शिक्षणात सातत्य ठेवावे आणि उपलब्ध संधींचा योग्य उपयोग करून उज्ज्वल भविष्यासाठी प्रयत्न करावेत, असे आवाहन त्यांनी केले. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देणारे सामाजिक उपक्रम त्यांच्या आत्मविश्वासाला बळ देतात, असेही त्यांनी नमूद केले. आरोग्याची जाणीव, शिक्षणाची साथ आणि सामाजिक बांधिलकी यांचा सुंदर संगम घडविणारा हा उपक्रम विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरला.

'निरोगी विद्यार्थी – सक्षम विद्यार्थी' या संकल्पनेला प्रत्यक्ष कृतीची जोड देत हा उपक्रम सामाजिक संवेदनशीलतेचा प्रेरणादायी संदेश देऊन गेला.

## थोडक्यात बातम्या

# श्री ढोकेश्वर कॉलेजमध्ये विज्ञान मंडळाचा शुभारंभ; 'अविष्कार प्रोजेक्ट्स प्रेझेंटेशन' स्पर्धा उत्साहात



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१६, पारनेर (अहिल्यानगर) :** तालुक्यातील टाकळी ढोकेश्वर येथील अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेच्या श्री ढोकेश्वर महाविद्यालयात विज्ञान मंडळाच्या उद्घाटनानिमित्त 'अविष्कार प्रोजेक्ट्स प्रेझेंटेशन स्पर्धा – २०२६' मोठ्या उत्साहात संपन्न झाली. नुकतेच सी.व्ही.रामन हॉलमध्ये या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले.

प्रा.गायगवाड एस.बी. यांनी प्रास्ताविकातून विज्ञान मंडळाच्या उपक्रमांची व स्पर्धेची भूमिका विशद केली. प्रा.वाल्हेकर एन.एम. यांनी प्रमुख पाहुण्यांचा परिचय करून दिला. प्राचार्य डॉ.एल.एस.मतकर यांच्या हस्ते पाहुण्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी मार्गदर्शन करताना प्रमुख पाहुणे डॉ.बी.एच.झावरे म्हणाले की, विज्ञान हे केवळ पुस्तकी ज्ञान न राहता प्रयोग, संशोधन आणि समाजोपयोगी विचारातून समृद्ध झाले पाहिजे. विद्यार्थ्यांनी जिज्ञासा व संशोधक वृत्ती जोपासून नाविन्यपूर्ण प्रकल्प सादर करावेत. अविष्कार सारख्या स्पर्धा वैज्ञानिक दृष्टिकोन आणि आत्मविश्वास वाढवतात. प्राचार्य डॉ.एल.एस.मतकर व कार्यक्रमाचे अध्यक्ष सीताराम खिलारी यांनीही विद्यार्थ्यांना शुभेच्छा देत मार्गदर्शन केले.

या स्पर्धेत विद्यार्थ्यांनी आपल्या संशोधनात्मक कल्पना व मॉडेल्स सादर केले. विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग लक्षणीय होता. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.डॉ. जिजाभाऊ घुले यांनी तर आभार प्रा.डॉ.गंगोत्री व्ही.एम. यांनी मानले.

# अहिल्यानगर जिल्ह्यात गणेशोत्सव, नवरात्रोत्सवात डॉल्बीवर बंदी

## अतिरिक्त जिल्हा दंडाधिकारी दादासाहेब गीते यांचे आदेश

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१६, अहिल्यानगर :** जिल्ह्यात गणेशोत्सव व नवरात्रोत्सवाच्या कालावधीत डॉल्बी साउंड सिस्टिम व उच्च आवाजाच्या ध्वनी वर्धकांच्या वापरास दिनांक १४ सप्टेंबर पासून प्रतिबंध घालण्यात आल्याचा आदेश अतिरिक्त जिल्हा दंडाधिकारी दादासाहेब गीते यांनी काढले आहेत. दि. १४ ते २५ सप्टेंबर दरम्यानच्या गणेशोत्सवात तसेच ११ ते २० ऑक्टोबर या नवरात्रोत्सव कालावधीसाठी ही बंदी घालण्यात आली आहे.

उच्च आवाजाच्या ध्वनीवर्धकांच्या वापरामुळे ध्वनी प्रदूषण निर्माण होऊन वृद्ध व्यक्ती, रुग्ण, गर्भवती महिला, लहान मुले व नागरिकांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होण्याची शक्यता आहे असे नमूद करत ही बंदी घालण्यात आली आहे. आदेशात म्हटले की, मुंबई उच्च न्यायालयात दाखल जनहित याचिकांच्या न्यायनिवड्यामध्ये ध्वनी प्रदूषण अधिनियम २००० तसेच पर्यावरण संरक्षण अधिनियम १९८६ मधील तरतुदीनुसार ध्वनी प्रदूषण नियंत्रण व नियमन करण्यासाठी आदेश पारित करण्यात आले आहेत. या आदेशाचे पालन करताना पोलीस प्रशासन व मंडळाचे कार्यकर्ते पदाधिकारी यांच्यामध्ये संघर्ष होऊन तणावाची परिस्थिती निर्माण होते. प्रसंगी कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होतो.

गणेश प्रतिष्ठापना, गणेश विसर्जन, घटस्थापना व दसरा या काळात डॉल्बी साउंड सिस्टिम व उच्च आवाजाच्या ध्वनीवर्धकांच्या वापरामुळे ध्वनी प्रदूषण होते. त्याचा नागरिकांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होतो. सार्वजनिक शांततेचा भंग होतो. कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होतो. मानवी आरोग्य व सुरक्षिततेस धोका निर्माण होण्याची शक्यता असते. त्यामुळे गणेशोत्सव, नवरात्रोत्सवाच्या कालावधीत डीडे वापरण्यास बंदी घालण्यात आली आहे. या कालावधीत जिल्ह्यातील डॉल्बी मालक चालक यांनी ते उत्सव कालावधीत रोखून ठेवणे आवश्यक आहे. डॉल्बी सिस्टीमला प्रतिबंध करण्याकरिता मालक व चालकांनी ती वापरात आणू नये, यासाठी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ नुसार बंदी घालण्यात आली आहे. या कालावधीत डॉल्बी चालक व मालक यांना अशा उपकरणांचा वापर, भाड्याने पुरवठा किंवा उपलब्ध करून देता येणार नाही, असेही आदेशात नमूद करण्यात आले आहे.

दरम्यान गणेशोत्सव शांततेत पार पाडावा, कायदा सुव्यवस्था अबाधित रहावी यासाठी नगर शहर पोलिसांनी ४९२ जणांना तडीपार करण्याची कारवाई केल्याची माहिती शहर पोलिस उपअधीक्षक डॉ. दिलीप टिपरसे यांनी दिली. याशिवाय उत्सव काळात शांतता ठेवावी. यासाठी ३८३ जणांकडून बंधनपत्र घेण्यात आले आहेत.

# ३ वर्षांपासून जल जीवन मिशनचे काम अपूर्ण;पोटा ग्रामस्थ पाण्यासाठी त्रस्त



**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.१६, नागपूर :** शासनाच्या महत्त्वाकांक्षी जल जीवन मिशन योजनेचे काम मौजा पोटा येथे मागील ३ वर्षांपासून सुरू असून अद्यापही गावातील नागरिकांना योजनेचा अपेक्षित लाभ मिळालेला नसल्याने ग्रामस्थांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. योजनेअंतर्गत पाण्याची टाकी बांधून जवळपास ३ वर्षांचा कालावधी उलटला असतानाही अनेक नागरिकांच्या घरापर्यंत पिण्याच्या पाण्याची वैयक्तिक नळजोडणी देण्यात आलेली नाही. त्यामुळे गावात पिण्याच्या पाण्याचा तुटवडा निर्माण होत असून नागरिकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे. जल जीवन मिशनच्या पाईपलाईनसाठी गावातील विविध रस्ते खोदण्यात आले असून ते अद्याप व्यवस्थित पूर्ववत करण्यात आलेले नसल्याने नागरिकांना ये-जा करताना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. विशेष म्हणजे मुख्य पाईपलाईन जमिनीत टाकून बराच काळ पडून असल्याने तिच्या मजबुतीवर व गुणवत्तेवर परिणाम झाला असण्याची शक्यता ग्रामस्थांकडून व्यक्त करण्यात येत आहे. त्यामुळे पाणीपुरवठा सुरू करण्यापूर्वी संपूर्ण मुख्य पाईपलाईनची तांत्रिक तपासणी, गळती चाचणी व गुणवत्तेची पडताळणी करावी, अशी मागणी होत आहे. तसेच, गावात बांधण्यात आलेल्या पाण्याच्या टाकीच्या बांधकामाच्या गुणवत्तेबाबतही ग्रामस्थांनी प्रश्न उपस्थित केले असून काम प्रथमदर्शनी निकृष्ट दर्जाचे झाल्याचा आरोप करण्यात येत आहे. शासनाच्या निधीतून होणाऱ्या या कामाची संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष पाहणी करून तांत्रिक तपासणी करावी, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे.३ वर्षांचा कालावधी उलटूनही जल जीवन मिशनचे काम पूर्ण न झाल्याने शासनाच्या योजनेचा उद्देशच प्रश्नांकित होत आहे. संबंधित विभागाने तातडीने लक्ष घालून अपूर्ण नळजोडण्या पूर्ण कराव्यात, गावातील पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सोडवावा, मुख्य पाईपलाईन व पाण्याच्या टाकीच्या कामाची गुणवत्ता तपासावी तसेच खोदलेले सर्व रस्ते तातडीने पूर्ववत करावेत, अशी मागणी पोटा येथील ग्रामस्थांनी केली आहे.